NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# कोरोना संकट आणि भारत

**प्रा.डॉ.प्रफुल्ल अ राऊत**
विभाग प्रमुख राज्यशास्त्र
एन.ए.देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय चांदूर बाजार जि.अमरावती

.................................................................................................................

**प्रस्तावना:**

जगात दोन महायुध्दे झाली त्या नंतर जगात शांतता प्रस्थापीत व्हावी व मानव जातीचा संहार होवू नये म्हणून १९४५ मधे संयुक्त राष्ट्र संघटनेची रशिया या दोन महासत्तामधे शितयुध्दाला सुरूवात झाली.अत्याधुनिक व अत्यंत संहारक अण्वस्त्रे निर्माण करण्याची चढाओठ या राष्ट्रात सुरू होती. शित युध्द सुरू असल्यामुळे जंगाची तिन गटात विभागणी झाली.एक अमेरीका या महासत्तेच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या देशाचा एक गट तर दुसरीकडे साम्यवादी रशियाच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या राष्ट्राचा दुसरा गट जगात निर्माण झाला.दोन्ही महासत्तानी आपआपल्या नेतृत्वात असलेल्या देशांना शस्त्रात्रे तसेच आर्थिक मदत देण्याचे धोरण स्वीकारले. शित युध्द सुरू असतांनाच जगात दुसऱ्या महायुध्दानंतर नियत्रंण व संतुलन हे तत्व सुध्दा अनुभवास मिळाले याच काळात आशिया खंडातील चीन मधे साम्यवादी क्रांती होवून चीन हे शक्तीशाली राष्ट्र उदयास आले चीन ने अत्यावधीत सर्व क्षेत्रात प्रगती करून आपणही महासत्तेच्या स्पधेत आहे.हे जगाला दाखवून दिले.या शिवाय आशिया खंडातील मोठी लोकसंख्या असणारे लोकशाही प्रधान राष्ट्र भारताने अलीपत्तावादाचे धोरण स्वीकारले.तरीही प्रांरभी भारत व रशिया मित्र राष्ट्र राहीले आहे.आज भारत व अमेरीका मित्र राष्ट्र आहे. असा आभास आहे. परंतु आज तिसरे महायुध्द झाल्यास पृथ्वीचा विनाश निश्चित आहे.त्यामुळे सर्वच महासत्ता मधे नियत्रंण व सतुलन तत्वाच्या आधारे राजकारण सुरू आहे. आता युध्द नको ,शांतता हवी ही घोषणा करण्यात आली.परतु त्यानंमरच्या काळात तिसऱ्या महायुध्दाला सुरूवात झाली ते युध्द म्हणजे आर्थिक महायुध्द होय.अमेरीका हे आज जगाच्या नेतृत्व करणारी महासत्ता ठरली आहे.रशियातील राजकीय परीस्थीतीमुळे रशिया आज पुर्णपणे शक्तीशाली राष्ट्र राहीले नाही.परतु अलीकडच्या काळात आशिया खंडात चीन हे शक्तीशाली राष्ट्र म्हणून उदयास आले.त्याच्या जगाच्या राजकारणावर फार मोठा परीणाम झालेला दिसून येतो.चीनची सर्व क्षेत्रात आपली आर्थीक प्रगती करून घेतली आहे.व यानंतर खऱ्या अर्थाने अमेरीका चीन व यूरोपखंडातील काही राष्ट्रे यांच्यात तिसऱ्या आर्थीक महायुध्दालर सुरूवात झाली.शक्तीशाली महासत्ता असणाऱ्या राष्ट्रानी स्वताहाच्या स्वार्थासाठी १९९१ मध्ये गॅट करार घडवून आणला. व जागतीकीकरण,खुली अर्थव्यवसाी,उदारमतवाद हे धोरण जगासमोर मांडले याची परीनिती गॅट करारात झाली.यात जगातील बहूताश राष्ट्रे सहभागी झाली.खुली अर्थव्यवस्था हे आर्थीक महासत्त असलेल्या राष्ट्राचे षडयंत्र होते.परतु यामुळे अविकसीत राष्ट्रे गॅट करारात सहभागी झाले.भारत सुध्दा याला अपवाद नाही.परंतु भारत हे अल्वावधीत विकसनशील राष्ट्र म्हणून पुढे झाले.तयेच चीनला स्पर्धक म्हणून भारताचे आशिया खंडातील स्थान मोठ आहे. याची जाणीव जगाला झाली भारताने कोनत्याही एका गटात न जाता अलीपत्तावादी देशाचे नेतृत्व स्वीकारले.भारताची प्रंचड १३० कोटी लोकसंख्या व विशाल भुप्रदेश हे भारताचे बलस्थान आहे.तसेच जगात सर्वात जास्त तरूण लोकसंख्या भारतात आहे.हे भारताचे फार मोठे वैभव आहे.भारतात प्रारभी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली व सार्वजनीक व खाजगी अशा दोन्ही पर्यायातुन देशाचा विकास घडवून आणला.भारत हे कृषीप्रधान राष्ट्र आहे.भारतातील ७०: जनता शेतीक्षेत्रावर अवलंबून आहे. भारताने स्वातन्त्र्यानंतर कृषीक्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणून देश अन्नधान्याच्या बाबत समुध्द केला. तसेच अन्नधान्याचा निर्यातदार राष्ट्र म्हणून जगात उदयास आले.भारताला गॅट करारात सहभागी करून घेण्यासाठी विशेष्र प्रयत्न जगातील महासत्ता व औघौगीक दृष्टया प्रगत राष्ट्रानी केले याला कारण भारत जगातील सर्वात मोठी बाजारपेठ होय.अमेरीका व मित्र राष्ट्रानी भांडवलवादी धोरणाचे पुरस्कर्ते तर रशिया व चीन तसेच काही अन्य राष्ट्रे गॅट करारात सहभागी झाले.याचे कारण खुल्या अर्थव्यवस्थेचा मोठा फायदा अमेरीका रशिया चीन व युरोप खंडातील काही प्रगत राष्ट्राना होणार होता. व यासाठी भारताची मोठी बाजारपेठ हे या राष्ट्राचे लक्ष्य होते.हे आता लक्षात आले आहे.

भारत १९९१ मध्ये गॅट करारात सहभागी झाले याचे कारण आपण जगात एकटे पडू व दुसया महायूध्दानंतरच्या काळात प्रत्येक देशाने परस्पर सहकार्यानेच आपले धोरण निश्चित करणे अपरीहार्य होते.परतु भारत याला बळी पडला नाही.कारण भारताची मोठी बाजारपेठ आज चीन व अमेरीका व युरोप खंडातील जपान व अन्य राष्ट्रांनी काबीज केले आहे.चीन व रशिया गॅट करारात सहभागी होवून खुली अर्थव्यवस्था स्वीकारली पण आपली दारे सतत उघडी ठेवली नाही. व भारताच्या बाजारपेठेच्या प्रगतीशील राष्ट्रांनी मोठया प्रमाणात आर्थिक फायदा करून घेतला आहे.खरे तर भारताने शुध्द समाजवादी लोकतंत्राचा स्वीकार करून स्वबळावर विकास घडवून आणणे गरजेचे होते.देशातच छोटया लघु,मध्यम व मोठया उघोगाची उभारणी करून भारतासारख्या मोठया बाजारपेठेवर भारताचाच कब्जा हवा होता. आजच्या काळात बाहयजगाशी सुध्दा संबध ठेवुन स्वताहाची अर्थव्यवस्था स्वबळावर मजबूत करणे आवश्यक होते.

आज जगात तिसऱ्या आर्थिक महायुध्दाला सुरूवात झाली आहे.हे युध्द शस्त्राने न लढता जैविक हत्यारे वापरून आर्थिक महासत्ता होणे यासाठी लठवले जात आहे.चीनमध्ये कोरोनाचा उद्रेक झाल्यानंतर चीनने तो जानीवपूर्वक तो जगभर पसरेल याची पुरेपुर व्यवस्था केली होती.कोरोना हा विषाणू निर्जीव नसून उत्क्रात केलेला आहे.वुहान मधील जिवाणू प्रयोगशाळेत तो निर्माण करण्यात आला.याला चीनच जवाबदार आहे.याचे महत्वाचे कारण व चीनचे युध्द म्हणजे आर्थिक महासत्ता होणे हे होय.तेव्हा कोरोना संपल्यानंतर या संर्दभात भारताने जागतीक संदर्भात नविन धोरण आखणे गरजेचे आहे. राक्षसी वृत्तीच्या चीनला एकटे पाडले पाहीजे या साठी चीनी वस्तुवर पुर्णताहा बहीष्कार टाकावा स्वदेशीचा वापर करावा कोरोना ही भारतासाठी मोठी संधी ठरू शकते जागतीक जोखडातून बाहेर पडून देशातच मोठया प्रमाणात उघोग व्यवसाय व रोजगार निर्मिती केली पाहीजे.तरून लोकसंख्या हि भारताची फार मोठी शक्ती आहे.ती आज जगातील कोणत्याही राष्ट्रांकडे नाही.भारतातील अनेक तरूण तज्ञ,संशोधक,इंजिनिअर व वैघकीय सेवा देणारे भारताचे तरूण आज अमेरीका,युरोप व आस्ट्रेलीया या सारख्या देशात कार्यरत आहे. व हे देश आजही भारतीयाच्या सेवेवर अवलंबुन आहे.परतु अमेरीकेचे धोरण स्वार्थी ,धृर्त व पुर्णपणे व्यापारी आहे.गॅट करार झाल्यानंतर याचा सर्वात मोठा फायदा अमेरीका,चीन या राष्ट्रांनी घेतला.भारताची मोठी बाजारपेठ हे भारताचे सर्वात मोठे बलस्थान आहे.त्यामुळे भारताने आता स्वबळावरच उद्योग व अर्थव्यवस्था विकसीत केली पाहीजे.आजच्या काळात जगाशी संबंध ठेवणे अपरीहार्य आहे.परतु चीनने खुली अर्थव्यवस्था स्वीकारून त्याचा पुरेपुर लाभ उठविला पण पण आपली दारे सताड उघडी ठेवली नाही.भारताची बाजारपेठ आज चीन व अमेरीका या राष्ट्रांनी काबीज केली आहे. परीणामी बेरोजगारीची सख्या भारतात मोठया प्रमाणात वाढली आहे. भारतीय टॅलेटचा वापर अमेरीका करीत आहे.परंतु काम झाल्यावर खडयासारखे हाकलून देत आहेत.त्यामुळे आर्थीक धोरणाचा पूर्नविचार होणे गरजेचे आहे.भारताने आता इतर देशांवर अवलंबुन राहण्याचे धोरण थांबविले पाहीजे.हे कोरोनाने सिध्द करून दाखविले आहे.मानवी गरजा कीती मर्यादीत असतात हे आपल्या प्राचीन संस्कृतीने सिध्द केले आहे.काचेच्या बंदद्वार ए.सी मधे बसून खेडयातल्या रणरणत्या उन्हाचे धोरण ठरवणे थाबले पाहीजे.सर्व आर्थीक व शैक्षणीक धोरण जमीनीवर पाय ठेवून निश्चित केले पाहीजे.

सध्या कोरोनावर मात करणे आवश्यक आहे.परतु दुदैवाने केन्द्रातील मोदी सरकार एवढया मोठया संकटाच्या वेळी सुध्दा फारसे गंभीर दिसून येत नाही.केन्द्राने ठामपणे राज्याच्या पाठीशी उभे राहीले पाहीजे.राज्याचा वाटा घटनेनूसार राज्यांना त्वरीत दिला पाहीजे.परंतु यात राजकारण होताना दिसून येत आहे.प्रंतप्रधान मोदीनी राज्यांना मार्गदर्शन व आर्थिक मदत करणे गरजेचे आहे. घटकराज्ये कसोशीने कोरोना संकटाचा मुकाबला करत आहे.आरोग्य हा विषय राज्यसुचीत आहे. त्याच्या मोठा आर्थिक भार प्रत्येक घटकराज्यावर पडत आहे. व राज्याच्या उत्पनाची साधने मर्यादीत आहे.तेव्हा केन्द्रशासनाने राजकारण न करता ठामपणे आर्थिकदृष्टया राज्याच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे.एवढेच अपेक्षीत आहे.मा.खा.राहूल गांधी यांनी फेबुवारी २०२० मध्येच या बाबत केन्द्रशासनाला सुचना दिली होती.पण त्याकडे मोदीनी साफ दुर्लक्ष केले. हा राजकारणाचा विषय नव्हता तर कोरोना संकटाचा विषय होता.कोरोना विषाणूची कार्यक्षमता बघता १३० कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशात काय परीस्थीती होवू शकते याचा प्रत्यय आता येवू लागला आहे.

तरी जगाच्या तुलनेत भारतातील घटक राज्यांनी वेळीच पावले उचलली त्यामुळे आपण मर्यादेपलीकडे गेलो नाही. परंतु आगामी काळात कोरोना संकट अधिक गभीर होणार आहे.कोरोना कोरोना काळात भारतीय जनता एकजुटिने कार्य करते हे दिसून आले. जनता व स्वयंसेवी संस्था या काळात मदत करत आहे.प्रधानमंत्री मोदीनी पी.एम केअर फंड नव्याने निर्माण केला त्यात मोठे देशातील सर्व मोठे उद्योगपती,श्रीमंत,अभिनेते व भाजपाचे भारतातील सर्व खासदार व आमदारानी आपला निधी दिला आहे.त्यामुळे आर्थिक दृष्टया कोरोनावर मात करणे शक्य आहे.पण केन्द्र शासनाने कोरोनाचे संकट गांर्भीयाने घेणे गरजेचे आहे.स्वातन्त्र्यापासून प्रधानमंत्री सहायता निधी अस्तीत्वात असताना नव्याने पी.एम.केअर फंड का निर्माण करण्यात आला? हे समजले नाही. कोरोना एक सुक्ष्म विषाणू डोळयाने न दिसणारा परंतु त्याने सर्व जग स्तब्ध करून टाकले. मानवाने आजवर अनेक संकटावर ;भारतानेद्ध साथरोग यावर नियंत्रण आणण्यात यश मिळवले आहे.परतु कोरोनावर मात्र अजूनही लस शोधण्यात यश आले नाही कारण कोरोना उत्क्रात व मानवनिर्मित आहे.कोरोनाच्या संदर्भात असे स्पष्ट झाले की निसर्गावर मात करणे अशक्य आहे.तेव्हा निसर्गाला शरण जा निसर्ग स्वत:हाला वेळ आल्यास सतुलीत करून घेवू शकतो.हे कोरोनाने सिध्द केले आहे.आज प्रदूषण,नद्या,पशु,पक्षी यात बदल झालेला दिसून येतो.पृथ्वीतलावर प्रथम जीवजंतुचीच निर्मीर्ती झाली व माणूस सर्वात शेवटी उदयास आला.परतु मानवाने संपूर्ण विश्वावर आपले अधिराज्य प्रस्थापीत केले निसर्गात हा प्रत्येकाचा अधिवास आहे.परंतु मानवाणे इतराच्या प्राणी,पशु,पक्षी व जीवजतु इ च्या क्षेत्रात अतिक्रमण केले आहे.निसर्ग नियमाच्या विरूध्द आहे. कारण मानवापेक्षा मोठी जनसंख्या पशु पक्षी,जीवजंतु यांची आहे याचा मानवाने आता विचार करावयास हवा कोरोना सकट आणि भारत या विषयाला बरेच सामाजीक,आर्थीक,राजकीय कंगोरे आहे.स्तब्ध झालेली अर्थव्यवस्था रूळावर येण्यास कीती काळ लागणार हे निश्चित सांगता येत नाही.परतू भारताच्या या सकटाच्या काळात शेतकरीच देशासाठी कामाला आला त्यानेच अन्नधान्य,फळे,भाजीपाला,दुध पुरविले यापेक्षा माणसाला जगण्यासाठी काय लागते.हे कोरोनाने दाखवून दिले.म्हणून शेतकरी,कामगार याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे गरजेचे आहे.अर्थव्यवस्था डबघाईस आल्याबरोबर उद्योग जगतात खळबळ उडाली करमाफी करावी,कर्ज दयावे,व्याजदरात सुट दयावी अशा मागण्या सुटबूट घालणाऱ्या लोकांकडून आल्या व जेव्हा शेतकऱ्याला कर्जमाफी देण्याचा प्रश्न येतो तेव्हा रिझर्व बॅक अर्थव्यवस्था धोक्यात येईल असे भाकीत करते परतु आता उद्योगजगतासाठी त्याच रिझर्व बॅकने बुस्टर डोस जाहीर केला आहे.शेतकऱ्यावर शेकडो सकटे येतात तरी तो नव्या उमेदीने उभा राहतो.पण आपण त्याच्या अगंमेहनतीने पिकविलेल्या व आपली मुलभूत गरज असलेल्या अन्नधान्य,भाजीपाला याला भाव देत नाही.महागाई न वाढता वर्षातून दोनदा महागाई भत्ता वाढविला जातो.या सर्व प्रश्नाची भारताच्या संदर्भात आर्थिक व राजकीय,सामाजीक उत्तरे कोरोनाने दिली आहेत.कोरोना संकटकाळात आपण सर्वानी एकजुटीने शासनाच्या पाठीशी उभे राहीलो पाहीजे.हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.तसेच या संकटकाळात श्रीमंतानी माणसाला जगवले पाहीजे.कारण देशाच्या जनतेच्या भरवश्यावरच सर्वानी आपले वैभव उभे केले आहे.म्हणून आज निसर्गाधिष्ठीत समतेचा विचार व्हावयास हवा.भारताने सुध्दा कोरोनाची संधी साधून जागतीक जोखंडातून बाहेर पडून समाजवादी लोकशाहीचा नव्याने स्वीकार केला पाहीजे कारण अत्यत टोकाची आर्थिक विषमता हे कोणत्याही देशाचे चांगले लक्षण नाही.भारताला समृध्द,प्राचीन,संस्कृती लाभली आहे.की ज्यात निसर्गाचा देखील समावेश आहे.म्हणून केवळ दिखावूपणा चक्क शहरे लायटीग म्हणजे राष्ट्र नाही. तर प्रत्येक व्यक्तीचा सर्वागिण विकास हेच चांगल्या राष्ट्राचे लक्षण आहे.सर्व एकजुटीने कोरोना संकटाचा मुकाबला करूया.

**सदर्भ:**


01) दै.लोकसत्ता

02) दै.लोकमत

03) दै.सकाळ

04) दै.देशोन्नती

05) आज.तक.न्युज चॅनेल

06) ए.बी.पी.न्युज चॅनेल

07) साम.टीव्ही.न्युज चॅनेल

08) झी २४ तास.न्युज चॅनेल